CNR No.MHAK02-004380-2022 दिवाणी कि. अर्ज १९१३/२०२२
तहेरा खातून विरुध्द.. निरंक

## निशाणी १ खालील आदेश

१. अर्जदार ताहेरा खातून आझाद खान यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा दाखला मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन थोडक्यात की–

अर्जदार यांचे पती नामे आझाद खान अजिम खान यांचे निधन दिनांक २६.१०.२०१० रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे झाला आहे. अर्जदारची आई – वडील हे सुध्दा बरेच दिवसांआधीच मरण पावलेले आहेत. मयत व अर्जदार यांना कोणतेही मुलबाळ नाही. त्यामुळे अर्जदार हीच मयत आझाद खान अजिम खान यांची कायदेशिर वारस असून त्यांचेशिवाय इतर कोणिही वारस नाही. सबब अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदार यांनी फेरिस्त निशाणी ४ सोबत पडताळणी केलेले छायांकित दस्त अ.क्र.१ ला मयत आझाद खान अजिम खान यांच्या मृत्यूचे प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत (निशाणी १२), अ.क्र.२ ला अर्जदारचे आधार कार्डची प्रमाणीत प्रत (निशाणी १३) इ. कागदपत्रे दाखल केली आहेत.

४. तसेच अर्जदार यांनी त्यांचे अर्जातील कथनाच्या पुष्टयर्थ निशाणी ०६ वर स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

५. तसेच अर्जदार यांनी ते मयत आझाद खान अजिम खान यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून, तसे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्ज दाखल केल्यानंतर वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन, तसेच अर्जदार यांचे पत्यावरती मौजे अकोला येथे जावून मयत यांच्या घरास जाहीर नोटीस लावली आहे, दुसरी प्रत चावडी येथील नोटीस बोर्डवरती, तसेच तिसरी प्रत मा.

जिल्हा अधिकारी कार्यालय व चौथी प्रत न्यायालयाच्या नोटीस बोर्डवरती जाहीर नोटीस लावुन अर्जाबाबत हरकती मागविल्या. सदरची जाहीर नोटीस दिनांक २४.११.२०२२ रोजी जाहीर केलेली आहे. तसेच जाहीर नोटीस (निशाणी १०) ही दैनिक दर्शन या वर्तमानपत्रात दिनांक २९.११.२०२२ रोजी जाहीर केलेली आहे. परंतु आज अखेर त्याला कोणतीही हरकत आलेली नाही.

**६.** अर्जदार यांच्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्राने व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन अर्जदार यांचे पती मयत आझाद खान अजिम खान यांचे निधन दिनांक २६.०८.२०१० रोजी अकोला येथे झाले आहे व अर्जदार हे सरळ वारस आहेत, या बाबीस दुजोरा मिळतो. याशिवाय याकामी दिनांक २४.११.२०२२ रोजी जाहीर नोटीस देवूनही, तसेच दिनांक २९.११.२०२२ रोजी दैनिक दर्शन या वर्तमानपत्रात निशाणी ०९ च्या कागदयादी सोबत दाखल केल्याप्रमाणे जाहीर नोटीस देवूनही याकामी अर्जदार यांच्या अर्जास विरोध करण्यास कोणिही समोर आलेले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी दाखल केलेला साक्षीपुरावा अबाधित राहिला असल्याकारणाने अर्जदार यांचा अर्ज, अर्जदार यांचे लाभात मंजूर करणे योग्य व न्यायक राहणार आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांनी या अर्जात नमूद केल्याप्रमाणे मयत आझाद खान अजिम खान यांचे मृत्यू पश्चात त्यांचे सरळ व कायदेशीर वारस असल्याबाबत त्यांना वारस प्रमाणपत्र त्यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यावर त्यांना देण्यात यावे.

Digitally signed by NIKHIL DHANAJIRAO JADHAV
Date: 2023.01.09 17:53:20 +0530

( एन. डी. जाधव )
२रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर ),
अकोला.

अकोला
दिनांकः ०७.०१.२०२३

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : Sau. A.M.Sathe, |
| Court Name | : J.M.F.C., Court No. 02, Akola. |
| Date | : 07-01-2023 |
| Signed by presiding officer on | : 07-01-2023 |
| Uploaded on | : 09-01-2023 |